**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे**
**कलम ४१(१) मधील अटकेबाबत**
**तरतुदींच्या पालना बाबत.**

**<u>विषय :- आरोपी अटके बाबत.</u>**

--- ०००० ---

फौजदार प्रक्रिया संहिता १९७३ मध्ये आरोपीच्या अटकेबाबतच्या कलम ४१ मध्ये सुधारणा झालेली असून, त्यानुसार तपासी अंमलदार यांनी सात वर्षे किंवा सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असलेल्या गुन्हयात आरोपींना अटक करतांना कलम ४१(१)(ब) मधील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे.

यानुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयानेही **<u>अर्नेश कुमार विरुध्द बिहार राज्य व इतर (क्रिमीनल अपील क्र. १२७७/२०१४)मध्ये</u>** दिलेल्या निकालात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१ मधील अटकेबाबतच्या सुधारणा व त्यातील तरतुदींच्या पालनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केलेले असून, त्यांचे काटेकोर पालनाबाबत सर्व राज्य सरकारांना आदेश दिलेले आहेत.

या बाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडिल जा.क्र. डीजीपी/२३/५४/IPC-४९८/७२५/२०१४ दि.०८.०७.२०१४ अन्वये मार्गदर्शक तत्वे प्राप्त झालेली आहेत. ती या सोबत जोडलेली आहेत. त्याचे सक्ष्म अवलोकन करावे.

फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम ४१ मधील तरतुदींच्या पालनासाठी आवश्यक बाबींची खालील प्रमाणे करणे आवश्यक आहे.

1) फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम ४१(१)(ब) अन्वये सात वर्षापेक्षा कमी असेल किंवा सात वर्षा पर्यत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या दखलपात्र गुन्हयाचा अपराधातील आरोपीला अटक करावयाची आवश्यकता पोलीस अधिकाऱ्यास वाटल्यास, त्यास अटक करण्यासाठी असलेल्या कारणांची चेकलिस्ट न्यायालयास सादर करणे आवश्यक आहे(नमुना **<u>क्रमांक.१)</u>** अटक करतांना अटकेच्या कारणांची नोंद वरुन स्टेशन डायरी नोंदी करुन मा.न्यायालयास सादर करण्यात येणाऱ्या रिमांड रिपोर्टमध्ये त्या बाबत नोंद करावी.

2) फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम ४१(१)(अ) अन्वये सात वर्षापेक्षा कमी असेल किंवा सात वर्षा पर्यत असू शकेल अशा मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र असणाऱ्या दखलपात्र गुन्हयाच्या अपराधातील आरोपीला अटक करण्याची आवश्यकता नसल्यास तपासी अंमलदाराने तसे लेखी कारण स्टेशन डायरीला नमुद केले पाहिजे व त्या बाबत न्यायालयाला फिर्याद दाखल झाले पासून दोन आठवडयाने आत कळविले पाहिजे. दोन आठवडयाचा कालावधी उलटून गेल्यास न्यायालयाकडे पाठविण्यचे पत्र हे पोलीस अधिक्षक / अपर पोलीस अधीक्षक मार्फतीनेच पाठविणे आवश्यक आहे. (नमुना **<u>क्रमांक -२)</u>**

3) फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम ४१(१) अन्वये आरोपीला अटक करण्याची आवश्यकता नसल्यास तपासी अंमलदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(१) अन्वये आरोपीला समक्ष हजर राहण्याची नोटिस फिर्याद दाखल झाले पासून दोन आठवडयाचे आत बजावणे आवश्यक आहे. (नमुना क्र.-३)

4) तपासी अंमलदाराने आरोपीला समक्ष हजर राहण्याच्या फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(१) अन्वये बजावलेल्या नोटिसला अनुसरुन आरोपी हा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(३) अन्वये हजर राहत असेल व अटीचे पालन करीत असेल , तरीसुध्दा आरोपीला अटक करण्याची आवश्यकता वाटल्यास, तशी अटकेबाबतची स्पष्ट कारणे नमुद करुनच फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(३) अन्वये अटकेची कार्यवाही करावी.(नमुना **<u>क्रमांक -४)</u>**

5) तपासी अंमलदाराने आरोपीला समक्ष हजर राहण्याच्या बजावलेल्या नोटिसला अनुसरुन आरोपी हा फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१(अ)(४) अन्वये हजर राहत नसेल अथवा आपली ओळख पटवून देत नसेल, तर त्या आरोपीचे बाबतीत न्यायालयाचा अंतरीम जामीन किंवा अटकपुर्व जामीनाचा कोणताही आदेश नसल्याची खात्री करुन सदर आरोपीस अटक करावी. (नमुना **<u>क्रमांक -५</u>** )

6) खालील प्रमाणे आरोपीला अटक करणेची कारणे असून त्यापैकी तपासी अंमलदार यांनी फक्त आवश्यक ती कारणे खुलाशावर स्वहस्ताक्षरात चेकलिस्ट मध्ये नमुद करावीत.

# अटकेच्या कारणांची चेकलिस्ट

*i.* त्याने आणखी कोणताही अपराध करण्यापासुन प्रतिबंध करण्यासाठी.

*ii.* अपराधाचे योग्य प्रकारे अन्वेषण करण्यासाठी.

*iii.* अपराधाचा पुरावा नाहीसा करण्याची शक्यता असल्याने किंवा कोणत्याही रितीने अश्या पुराव्यामध्ये फेरफार करण्यापासुन त्यास प्रतिबंध करण्यासाठी.

*iv.* ज्या व्यक्तीस प्रकरणाची वस्तुस्थिती माहीत आहे अश्या व्यक्तीस,अशी वस्तुस्थिती ,न्यायालयाकडे किंवा तपासी अंमलदार म्हणुन माझ्याकडे उघड करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी ,अश्या व्यक्तीस प्रलोभन दाखविण्यापासुन ,धमकी देण्यापासुन किंवा अभिवचन देण्यापासुन त्यास प्रतिबंध करण्यासाठी.

*v.* त्यास अटक केली नाही तर ,जेव्हा आवश्यक असेल ,तेव्हा , तो न्यायालयामध्ये उपस्थित राहील याची निश्चिती असु शकणार नाही.

टिप - उपरोक्त कारणे उदाहरणार्थ असुन त्यापैकी योग्य ती कारणे खुलाश्यासह स्टेशन डायरी , केसडायरी ,रिमांड रिपोर्ट / मा.कोर्टास अटकेबाबतची चेकलिस्ट यामध्ये लिहावीत.

## फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४१ अटके बाबत तरतुदी नमुने.

**नमुना क्र. १ :- सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असणाऱ्या गुन्हयात अटक केल्यास मा.कोर्टास अटक कारणा बाबत चेकलिस्ट.**

**नमुना क्र. २ :- सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असणाऱ्या गुन्हयात आरोपी अटक करावयास नसल्यास मा.कोर्टास पत्र (गुन्हा दाखल झाले पासून १४ दिवसाचे आत पाठवावे.)**

**नमुना क्र. ३ :- सात वर्षापेक्षा कमी शिक्षा असणाऱ्या गुन्हयात आरोपीस अटक करावयाची नसल्यास तपासकामी हजर राहण्याचे समजपत्र (Crpc ४१ (१) (अ) प्रमाणे)**

**नमुना क्र. ४ :- फौ.प्र.संहिता कलम ४१(१)(अ) प्रमाणे समजपत्र देवून आरोपी तपास कामी हजर राहत असेल व त्यास अटक आवश्यक असल्यास त्यास अटक केल्यावर मा.कोर्टास पाठवायची अटक करणांची चेकलिस्ट.**

**नमुना क्र. ५ :- फौ.प्र.संहिता कलम ४१(१)(अ) प्रमाणे आरोपी समजपत्र देवून उपस्थित राहत नसल्यास अगर त्यातील तरतुदींचा भंग करत असेल तर त्यास अटक करुन कोर्टास पाठविण्याचा अटक कारणांबाबतची चेकलिस्ट**

( नमुना-१ )

# आरोपीच्या अटकेबाबतची चेकलिस्ट

(फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४१ (१) (ब) (२) अन्वये )

**प्रति,**

**मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

..................................

**विषय** - आरोपीला अटक केलेबाबत

**संदर्भ** - मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र.१२७७/२०१४(स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र.९१२७/१३) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

**रिपोर्ट** - ......................................................................................

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की,................................पो.स्टे.भाग गुन्हारजि.नंबर............................कलम.................................................................................................................. अन्वये दि...../...../........वेळ....................प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्येखालील प्रमाणे आरोपी आहेत.

अटक तारीख वेळ.

१) ..................................................................................................................
२) ..................................................................................................................
३) ..................................................................................................................
४) ..................................................................................................................
५) ..................................................................................................................

त्यांना खालील कारणास्तव त्यांना अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्यांना वर प्रमाणे अटक करण्यात आलेली आहे. त्यांची अटकेच्या कारणांची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटक कारणांची चेकलिस्ट :-**

**दिनांक.:-** **तपासी अंमलदार सही**

**मार्फत :-**

**पोलीस निरीक्षक**

**..........................पोलीस स्टेशन**

( नमुना-२ )

# आरोपीला अटक न करण्याबाबतचे पत्र

(फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४१ (१) अन्वये )

**प्रति,**

**मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

.................................

**विषय -** आरोपीला अटक न केलेबाबत

**संदर्भ -** मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र.१२७७/२०१४(स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल)क्र.९१२७/१३) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

रिपोर्ट - ..................................................................................

---- ००००० ----

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, ........................ पो.स्टे. भाग गुन्हा रजि. नंबर...................... कलम......................................................अन्वये दि..../...../.........वेळ............... प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे आरोपी आहेत.

१) ...........................................................................................................................

२) ...........................................................................................................................

३) ...........................................................................................................................

४) ...........................................................................................................................

५) ...........................................................................................................................

सदर गुन्ह्यातील कलमांमध्ये शिक्षा ७ वर्षापेक्षा कमी असून , सदर आरोपीस खालील कारणास्तव तूर्तास अटक करणेची आवश्यकता वाटत नाही.

**कारणे :-**

**दिनांक:-** **तपासी अंमलदार सही**

**मार्फत :-**

**पोलीस निरीक्षक**

**............................ पोलीस स्टेशन**

(नमुना-३)

**तपासकामी हजर राहणेसाठी :-**

# समजपत्र

( फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४१ (१) अन्वये )

**प्रति,**

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

.................................................................

आपणा विरुध्द .....................पो.स्टे.येथे भाग गु.र.नं. ............... कलम ......................................................................अन्वये दि...../......./....... वेळ........ प्रमाणे गुन्हा दाखल असुन आम्ही ............................................... हे सदर गुन्ह्याचे तपासी अधिकारी आहोत.तरी आपण सदर गुन्ह्याच्या तपासकामी स्वतः दि...../......./........ रोजी ............ वा. ............................. पोलीस स्टेशन येथे उपस्थित राहावे. आपण सदर कालावधीत

1) इतर कोणताही अपराध करु नये,

2) गुन्ह्याच्या योग्य प्रकारे तपास प्रक्रियेत अडथळा होईल असे कृत्य करु नये.

3) सदर गुन्ह्यातील साक्षीदारांवर दबाव आणु नये अगर त्यांना प्रलोभन देवु नये.

4) अपराधाचा पुरावा नष्ट करु नये अगर पुराव्यात कोणत्याही प्रकारे फेरफार करु नये.

5) आपणास ज्या ज्या वेळी तपासकामी उपस्थित राहण्याचे आदेशित केले जाईल त्यावेळी उपस्थित राहावे.

सदर दिवशी आपण तपासकामी उपस्थित न राहील्यास अगर वरील सुचनांचे पालन न केल्यास आपणावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तपास अधिकारी

आरोपीनां समजपत्र मिळाल्याबाबतची
सही , दि...../......./.........

( नमुना-४ )

## आरोपीला नोटीस दिल्यानंतर तो हजर होवुन चौकशी अंती केलेल्या अटकेबाबतची चेकलिस्ट

(फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४१ (अ) (३) अन्वये )

प्रति,

मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

.........................................................................

विषय - आरोपीला अटक केलेबाबत

**संदर्भ** - मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र.१२७७/२०१४(स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र.९१२७/१३) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

रिपोर्ट - ..........................................................................................

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, .............................. पो.स्टे. भाग - गु.र.नं. ........................... कलम ......................................................................................... .......................... अन्वये दि......../....../........ वेळ ..................... प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये ..................... ......................................................................... वय ................ हा आरोपी असून,गुन्ह्यातील कलमांमध्ये शिक्षा ७ वर्षापेक्षा कमी असल्याने आरोपी फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४१ (अ) (३) अन्वये आमचे समक्ष हजर राहण्याची नोटीस दि...../......./......... रोजी देण्यात आली ती आरोपीस दि....../....../.......... रोजी मिळाली सदर नोटीसमध्ये नमुद केलेल्या दि......../......../........ वेळ. ................ व ठिकाणी ................... आरोपी आमचे समक्ष हजर झाला. त्याला आम्ही उपरोक्त गुन्ह्यासंदर्भात सविस्तर विचारपुस केली व आरोपीने सदर गुन्हा केलेला आहे, याबाबत माझी खात्री झाल्याने, त्यास खालील कारणास्तव अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्यास दि....../......./........ रोजी ........... वा. अटक करण्यात आलेली आहे. त्यांची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटक कारणांची चेकलिस्ट :-**

**१)**

**दिनांक :-** **तपासी अंमलदार सही**

**मार्फत :-**

**पोलीस निरीक्षक**

**..............................पोलीस स्टेशन**

(नमुना-५ )

# आरोपीच्या अटकेबाबतची चेकलिस्ट

(फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ चे कलम ४१ (अ) (४) अन्वये )

**प्रति,**

**मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी**

....................................

**विषय** - आरोपीला अटक केलेबाबत

**संदर्भ** - मा.सर्वोच्च न्यायालयाने अर्नेश कुमार विरुध्द बिहार राज्य व इतर क्रिमिनल अपिल क्र.१२७७/२०१४(स्पेशल लिव्ह पिटीशन (क्रिमिनल) क्र.९१२७/१३) अन्वये दिलेल्या निर्णयानुसार

रिपोर्ट - ...........................................................................

...........................................................................

---- ०००० ----

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर की, .......................पो.स्टे. भाग गु.र.नं.......................कलम...........................................................................................अन्वयेदि......./......./..... ....वेळ............. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. त्यामध्ये ............................................................................................................................................................................ ..हाआरोपीअसून, गुन्ह्यातील कलमांमध्ये शिक्षा ७ वर्षापेक्षा कमी असल्याने आरोपी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४१ (अ) अन्वये आमचे समक्ष हजर राहण्याची नोटीस दि...../......./....... रोजी देण्यात आली ती आरोपीस दि....../......./........रोजी मिळाली.

सदर नोटीसमध्ये नमुद केलेल्या दि....../....../....... वेळ ............ व ठिकाणी ....................................... आरोपी आमचे समक्ष हजर झाले नसुन ओळख लपविण्याचा प्रयत्न करत असुन अन्वेषन प्रक्रियेत अडथळा निर्माण करत आहे. आरोपीने सदर गुन्हा केलेला आहे, याबाबत माझी खात्री झाल्याने, त्यास खालील कारणास्तव अटक करणे आवश्यक असल्यामुळे त्यास दि......./....../......... रोजी ........... वा. अटक करण्यात आलेली आहे. त्यांची चेकलिस्ट खालील प्रमाणे आहे.

**अटक कारणांची चेकलिस्ट**

**दिनांक.:-** **तपासी अंमलदार सही**

**मार्फत**

**पोलीस निरीक्षक**

**.....................पोलीस स्टेशन.**

( नमुना-६ )

# -: नोटीस :-

**( फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ९१ अन्वये.)**

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

आपणास सुचित करण्यात येते की, ............................... पोलीस स्टेशन भाग गुन्हा रजि.नंबर .................... कलम ....................................................... अन्वये दि...................... रोजी ............. वाजता गुन्हा दाखल आहे. ज्याअर्थी आम्ही सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी आहे. त्याअर्थी आम्हास प्राप्त फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ९१ अन्वये अधिकारान्वये आपणास आदेशीत करतो की, सदर गुन्हयाचा तपासकामी पुरावा म्हणून खालील दस्तऐवज आवश्यक असून ते दि.................... रोजी ................... वाजता ............................. येथे आपण स्वत: अगर आपले अधिनस्त जबाबदार व्यक्ती मार्फत सादर करावे. जर सदर दस्तऐवज आपण सादर न केल्यास मा.कोर्टास त्याबाबत अहवाल सादर करुन कोर्टाच्या आदेशा प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरची **नोटिस माझ्या सही व शिक्यासह दिली आहे.**

दिनांक :-

पोलीस निरीक्षक

........................... पो.स्टे.

# अटक करतांना खालील बाबीची पुर्तता करावी.

==============================================================

१) मा.सर्वोच्च न्यायालयाने वरील निर्देशानुसार आरोपीस अटककेल्यानंतर तात्काळ संबंधीत न्यायालयाला कळविणे बंधनकारक आहे.

२) खालील नमूदप्रमाणे कारणे असुन तपासी अंमलदार यांनी फक्त आवश्यक ती कारणे खुलासेवार स्वहस्ताक्षरात चेक लिस्ट मध्ये नमुद करावीत

३) अटकेबाबतची कारणे स्टेशन डायरीत अटक नोंद घेताना नमुद करावी.

४) अटकेबाबतची कारणे हि रिमांड रिपोर्ट मध्ये नोंद करावी.

# तपासाबाबत अधिकार पत्र

प्रति,

.......................................

.......................................

.......................................

आपणास आदेशित करण्यात येते की, ...............................पोलीस स्टेशनभाग-............. गु.र.नं. ...............................कलम.....................................................................................................अन्वयेदि......../....../........प्रमाणे गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्याचा तपास आपण स्वतः करुन विहीत मुदतीत गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन गुन्ह्याची निर्गती करावी.

पोलीस स्टेशन

प्रभारी अधिकारी

दि.:-

# -: नोटीस :-

**( फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम १००(४) अन्वये )**

प्रति,

-------------------------

-------------------------

-------------------------

विषय :- पंच म्हणून उपस्थित राहणे बाबत...

संदर्भ :- गृहविभाग, शासन निर्णय क्र. डीजीपी-२०१२/प्र.क्र.१०/पोल-१०
दि.१२ मे २०१५ अन्वये...

--- ०००० ---

उपरोक्त संदर्भान्वये महाराष्ट्र शासनाने फौजदारी खटल्यातील सिध्दपराध प्रमाण वाढविण्यसाठी सात वर्ष व सात वर्षापेक्षा जास्त शिक्षा असलेल्या गुन्हयांमध्ये सरकारी कर्मचारी पंच म्हणून घेणे बाबत आदेशित केले आहे. त्यामुळे आपणास सुचित करण्यात येते की, .............................. पोलीस स्टेशन भाग गुन्हा रजि.नंबर ........................ कलम .......................................................................................................... अन्वये दि............................. वाजता ....................... गुन्हा दाखल असून त्यातील तपासात तात्काळ पंचनामा करणे असून आपण पंच म्हणून तात्काळ विनाविलंब ....................................................................................... येथे उपस्थित राहावे.

सदर नोटीस मिळूनही अनुपस्थित राहणे हा भा.दं.वि.कलम१८७, १८८ प्रमाणे अपराध आहे याची नोंद घ्यावी.

दिनांक :-

तपासी अंमलदार.

# -: नोटीस :-

**( फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ९१ अन्वये.)**

प्रति,

----------------------------------

----------------------------------

----------------------------------

----------------------------------

आपणास सुचित करण्यात येते की, ..............................................पोलीस स्टेशन भाग ........ .गुन्हा रजि.नंबर .................................. कलम ........................................................................ ........................................................अन्वये दि......../........./............ रोजी ...................... वाजता गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास ...............................................................................................हे करीत आहेत.ज्याअर्थी आम्ही .................................... पोलीस ठाणेचे पोलीस ठाणे अंमलदार आहोत. त्याअर्थी आम्हास प्राप्त फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम ९१ चे अधिकारान्वये आपणास आदेशीत करतो की, सदर गुन्हयाचा तपासकामी पुरावा म्हणून खालील दस्तऐवज आवश्यक असून ते **दि........./........./................. रोजी** ...................... **वाजता** .................................... **पोलीस स्टेशन येथेआपण** स्वत: सादर करावे. जर सदर दस्तऐवज आपण सादर न केल्यास मा.कोर्टास त्याबाबत अहवाल सादर करुन कोर्टाच्या आदेशा प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरची **नोटिस माझ्या सही व शिक्यासह दिली आहे.**

दिनांक :-

पोलीस निरीक्षक

.......................... पो.स्टे.